नि.दि.दावा.क्र. १४६/२०२३
शिला वि. अभिजीत
निशाणी क्र. १४ क्रमश :

**वादी तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुढील सरतपास वादीचे वकिल श्री.के.आर.देशपांडे यांचे मार्फत शपथेवर सुरू —**

९. मी माझे पुराव्याचे शपथपत्र वाचले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे.

१०. मी निशाणी १७ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. १ ला वादी शिला प्रमोद जोशी यांनी मला करून दिलेले मुखत्यारपत्राची पडताळणीकृत प्रत दाखल केली आहे. त्यावर शिला प्रमोद जोशी व माझी सही आहे. तसेच त्यावर दोन साक्षीदारांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी १८** देण्यात येते. (सदर मुखत्यारपत्राच्या पडताळणीकृत प्रतीला निशाणी देण्यास प्रतिवादीच्या वकीलांनी हरकत घेतली परंतु मुखत्यारपत्राबाबतचे कायदयाचे गृहीतक विचारात घेवून सदर हरकत नाकारण्यात आली.) वादीचे पती प्रमोदराव जोशी यांनी प्रतिवादी अभिजीत चोपडे यास दिलेल्या रकमेच्या वसुलीकरीता प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. त्या संदर्भात मी या प्रकरणात निशाणी १७ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. २ व ३ ला बॅंकेचे खातेउतारे दाखल केले आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर संबंधीत बॅंकेचा शिक्का आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी १९ व २०** देण्यात येते. (सदर खातेउता—यांना निशाणी देण्यास प्रतिवादीच्या वकीलांनी हरकत घेतली की सदर संगणकीय खाते उता—याबाबत पुरावा कायदयाचे कलम ६५—ब अन्वये प्रमाणपत्र जोडलेले नाही. सदर हरकत राखुन ठेवून केवळ प्रशासकीय कारणापुरती दिलेली खातेउता—यांना निशाणी कायम ठेवण्यात येत आहे.) आजघडीला वादीचे पती प्रमोदराव जोशी हयात नाही. ते कोरोना आजाराच्या कारणाने मरण पावले. त्यांचे मृत्युप्रमाणपत्र निशाणी २२ या कागदपत्राच्या यादीसोबत दाखल केले आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी २३** देण्यात येते.

११. वादीला निशाणी १९ व २० या खातेउता—यात असे दिसुन आले होते की तिच्या पतीने प्रतिवादीला रक्कम दिलेली आहे व सदर खाते उता—यात दिसत असलेली रक्कम प्रतिवादीकडुन परत मिळालेली नाही. म्हणुन वादीने वादीच्या वकीलांच्या मार्फत प्रतिवादीला दिनांक १६.०६.२०२२ रोजी नोटीस पाठविलेली आहे. सदर नोटीसची स्थळप्रत निशाणी १७ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. ४ ला दाखल आहे. त्यावर वादी व वादीच्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी २४** देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. ५ ला प्रतिवादीने वादीला प्रतिवादीच्या वकीलांच्या मार्फत पाठविलेला दिनांक २९.०६.२०२२ रोजीचा जबाब दाखल केला आहे.

त्यास **निशाणी २५** देण्यात येते. तसेच त्यानंतर वादीने वादीच्या वकीलामार्फत प्रतिवादीला दिनांक १५.०७.२०२२ रोजी पाठविलेल्या नोटीसीची स्थळप्रत सदर यादीसोबत अ.क्र. ६ ला दाखल आहे. त्यावर माझी व वादीच्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी २६** देण्यात येते. सदर नोटीसीबाबतची पोचपावती सदर यादीसोबत अ.क्र. ७ ला दाखल आहे. त्यास **निशाणी २७** देण्यात येते. तसेच सदर कागदपत्राच्या यादीसोबत अ. क्र. ८ ला प्रतिवादीने त्याचे वकीलाच्या मार्फत दिनांक ०५.०८.२०२२ रोजी पाठविलेल्या उत्तराची पडताळणीकृत प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी २८** देण्यात येते. परंतु आजपर्यंत प्रतिवादीकडुन वादीला घेणे असलेली रक्कम मिळालेली नाही.

**सरतपास संपला.**

**प्रतिवादीच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरून प्रकरण उलटतपासणीसाठी तहकुब.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—

दि. ०३.०९.२०२५.

( महेश एस. काळे )

**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अकोट**